महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन**, 3 **रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर** - 440 022

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/2768/2024-25 **दिनांक** :-11/10/2024

**भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांकरिता MPSC-2024-25 परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी पुणे येथील प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता परिपत्रक**

महाज्योती या संस्थेद्वारे भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी MPSC-2024-25 परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता दि.27/09/2024 रोजी पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संस्थानिहाय यादी यासह प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच याद्वारे प्रशिक्षण कार्यवाही सुरू करण्यात येत आहे. निवड यादीतील विद्यार्थ्यांनी **ज्ञानदीप ॲकडमी, पुणे व युनिक ॲकडमी, पुणे** येथे **दि**.11/10/2024 **पासून ते दि**.15/10/2024 रोजी पर्यंत प्रशिक्षण केंद्रास प्रत्यक्ष जाऊन प्रवेश प्रक्रीया पूर्ण करुन घ्यावी.

**प्रवेश प्रक्रीयेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे**:-

1) आधार कार्ड
2) जातीचा दाखला
3) वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
4) पदवीचे प्रमाणपत्र/गुणपत्रक (पदवी परीक्षेत किमान 60% गुण असणे आवश्यक आहे)
5) दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र
6) अनाथ असल्यास प्रमाणपत्र
7) स्वयंघोषणापत्र

**प्रशिक्षण केंद्रांचे नाव व पत्ता-संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे**:-

1) **ज्ञानदीप ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र** -
   **पत्ता** :- TCG स्क्वेअर बिल्डींग, अल्का टॉकीज समोर, अल्का टॉकीज चौक, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे - 411030
   **संपर्क क्र.** 1) श्री. श्याम भोसले (8888136599)
   2) श्रीमती. माधुरी पोकळे (8830146428)
2) **युनिक ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र** -
   **पत्ता** :- युपीएससी कॅम्पस, चौथा माळा, Five Fitness Gym जवळ, गुरूकृपा कॉपलेक्स, ज्ञानेश्वर पादुका चौक, शिवाजीनगर, पुणे - 411004
   **संपर्क क्र.** 1) श्री. मारोती निरर्मल (9923943344)
   2) श्री. अशोक गायकवाड (9823331197)
   3) श्री. दत्ता घोरपडे (9823573344)
   4) श्री. अमित ओनकर (9850082211)

**रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना:-**

- प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल याची नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांची निवड संघ लोकसेवा आयोग (UPSC), संयुक्त गट ब व क (MPSC Group B & C), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, Staff Selection Commission Combined Graduate Level (SSC-CGL), बँकींग (IBPS-PO) किंवा महाज्योतीच्या इतर योजनांचा लाभ घ्यायचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया करू नये. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरिता निवड करता येणार नाही.
- प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता निवड करता येणार नाही.
- कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी महाज्योतीच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या ‘ सारथी ’ या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- सदर संस्थांमध्ये दि.15/10/2024 रोजी पर्यंत तात्पुरत्या निवड यादीतील विद्यार्थी रूजु न झाल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना रिक्त जागेवर संधी मिळेल.

**नोट** :-

- सोबत जोडण्यात आलेल्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांची कागदपत्रांची पडताळणी करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेत प्रवेश देण्यात येईल. तसेच कोणत्याही प्रकारची पुरविण्यात आलेली माहिती चुकीची आढळून आल्यास सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येईल.
- सदर परिपत्रकासोबत पात्र विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. निवड यादीतील ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया केली नाही अशा विद्यार्थ्यांच्या जागी प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांनुसार प्राध्यान्य देण्यात येईल.

स्वा
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर